# इतर फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२/२०२०

## सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–००००२७–२०२०

## निशाणी क्र.६८ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा सामनेवाला यांनी अर्जदार हिचा उलटतपास घेणेस परवानगी मिळावी या करिता दाखल केला आहे.

२. सामनेवाला यांनी आपल्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, त्यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध न झाल्याने अर्जदार यांचा उलटतपास घेता आला नाही. त्यामुळे सामनेवाला यांच्या विरोधात उलटतपास नाही असा आदेश पारित करण्यात आला आहे. सामनेवाला यांना बचावाची संधी न दिल्यास त्यांचा बचाव करण्याचा अधिकार बाधीत होईल. तरी अर्जातील कारणांचा विचार करता सामनेवाला यांच्या विरोधात पारित करण्यात आलेला उलटतपास नाही चा आदेश रद्द करावा अशी विनंती केली आहे.

३. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुत मूळ अर्ज हा आज रोजी अंतिम युक्तीवादा करिता नेमला आहे. यापुर्वी दि.२९/०८/२०२२ व दि.१९/१०/२०२४ रोजी सामनेवाला यांच्या विरोधात उलटतपास नाही असा आदेश पारित करण्यात आला आहे. तसेच दि.२९/०३/२०२३ रोजी सामनेवाला यांचा पुरावा बंद असा आदेश पारित करण्यात आला आहे. तसेच यापुर्वी देखील सामनेवाला यांनी नि.क्र.६३ येथे अर्ज दाखल करुन अर्जदार यांचा उलटतपास घेण्यास परवानगी मिळावी

अशी विनंती केली होती. सदर अर्ज नि.क्र.६३ नामंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे त्याच मागणीचा प्रस्तुतचा अर्ज कायद्याने टिकणारा नाही. सबब, वरील सर्व परिस्थीतीचा विचार करता मी खालील प्रमाणे आदेश करत आहे.

**– आदेश –**

अर्ज नि.क्र.६८ नामंजूर करण्यात येतो.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI

Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2026.08.01 17:52:35 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )

दिनांकः ०१/०८/२०२६ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड